**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१.**
**संकेतस्थळ :- https://scea.maharashtra.gov.in/**
फोन :- (०२०) २६०५०६४१ ई-मेल :- scea-pune@gov.in, sceapune@gmail.com

२८३
**क्र. रासनिप्रा / कक्ष- १७ / डिजिटल व्होटर्स लिस्ट / टेंडर / २०२३** **दि. ०९ / ०१ / २०२४**

सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१ हे त्यांचे अखत्यारीमध्ये येत असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या वेळोवेळी तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर सदर याद्या प्रसिद्ध करणे या कामासाठी इच्छुक सेवापुरवठादारांकडून देकार आणि दरपत्रके मागवीत आहेत. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या कामकाजाबाबत संकेतस्थळ www.scea.maharashtra.gov.in येथे सर्व तपशील व अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या शिवाय इच्छुक अर्जदारांना अधिक माहिती आवश्यक असल्यास त्यांनी या कार्यालयाकडे कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये संपर्क साधावा.

अर्ज सादर करण्याची मुदत दि. १०-०१-२०२४ ते दि. ३१-०१-२०२४ सायं. ०५.०० वा. पर्यंत या कालावधीत कार्यालयीन वेळेत राहील. कोणत्याही कारणाने उशीरा प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने.

**सचिव**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१.**
**संकेतस्थळ :- https://scea.maharashtra.gov.in/**
फोन :- (०२०) २६०५०६४१ ई-मेल :- scea-pune@gov.in, sceapune@gmail.com

**क्र. रासनिप्रा / कक्ष- १७ / डिजिटल व्होटर्स लिस्ट / टेंडर / २०२३ दि. ०९ / ०१ / २०२४**

सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१ हे त्यांचे अखत्यारीमध्ये येत असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या वेळोवेळी तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर सदर याद्या प्रसिद्ध करणे या कामासाठी इच्छुक सेवापुरवठादारांकडून देकार आणि दरपत्रके मागवीत आहेत.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या कामकाजाबाबत संकेतस्थळ www.scea.maharashtra.gov.in येथे सर्व तपशील व अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या शिवाय इच्छुक अर्जदारांना अधिक माहिती आवश्यक असल्यास त्यांनी या कार्यालयाकडे कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये संपर्क साधावा.

अर्ज सादर करण्याची मुदत दि. १०-०१-२०२४ ते दि. ३१-०१-२०२४ सायं. ०५.०० वा. पर्यंत या कालावधीत कार्यालयीन वेळेत राहील. कोणत्याही कारणाने उशीरा प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**प्रास्ताविक —**

महाराष्ट्र राज्यात दि. ३१-०३-२०२२ रोजी एकूण सहकारी संस्थांची संख्या २,१७,४१० (अस्थायी), तसेच, कृषि उत्पन्न बाजार समित्यांची संख्या ३०६ आहे. एकूण सहकारी संस्थांची संख्या २,१७,४१० (अस्थायी) पैकी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या अखत्यारीमध्ये "२५० अथवा त्यापेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था" येत नाहीत. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या अखत्यारीमध्ये विविध प्रकारच्या ०.९८ लाख संस्था येतात. या मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरीसहकारी बँका, नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी दूध उत्पादक संस्था आणि इतर प. दु. म. संस्था, सहकारी औद्योगिक वसाहती, औद्योगिक सहकारी संस्था, सहकारी संघीय संस्था, २५१ अथवा त्यापेक्षा जास्त सभासद संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था, इत्यादि वर्गीकरणातील संस्थांचा समावेश आहे.

## राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या अखत्यारीमधील संस्थांचे वर्गीकरण –

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २०१४ या नियमांनुसार निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून सर्व सहकारी संस्थांचे 'अ', 'ब', 'क', आणि 'ड' असे वर्गीकरण करण्यात आले आहे.

| अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग | ड वर्ग | एकूण संस्था |
|---|---|---|---|---|
| ३०० | २५,२२३ | ३२,६१८ | ३९,३३९ | ९७,४८० |

(सांख्यिकी माहिती दि. ३१-०३-२०२२ ची)

## निवडणूक प्रक्रियेचा संक्षिप्त आढावा –

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २०१४ या नियमांत नमुद केल्याप्रमाणे सहकारी संस्थांच्या (२५० पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी सदस्य असणा-या गृहनिर्माण संस्था वगळून) आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे आहे.

१. मतदार यादी तयार करणे—निवडणूकीस पात्र असणाऱ्या संस्थेने संचालक मंडळाची मुदत संपण्यापुर्वीच्या १२० दिवस आगोदर मतदार यादी नमुना ई – ३ मध्ये तयार करावी आणि सादर करावी.
   १.१. व्यक्ती सभासद असलेल्या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी.
   १.२. संस्था किंवा संस्था आणि व्यक्ती सभासद असलेल्या सह. संस्थांची तात्पुरती मतदार यादी.
   १.३. कृषि उत्पन्न बाजार समिती संदर्भात ग्रामपंचायत सदस्य व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे संचालक यांची तात्पुरती यादी
२. मतदारांची तात्पुरत्या यादी प्रसिद्ध करणे आणि दावे व आक्षेप मागविणे.
३. सर्व आक्षेप निकाली काढल्यानंतर मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणे
४. निवडणूक घेणेकरीता निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आणि आवश्यक असल्यास इतर अशा अधिका-यांची नियुक्ती करणे.
५. निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करणे.
६. उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र स्विकारणे आणि प्रसिद्ध करणे.
७. नामनिर्देशन पत्रांची छाननी करणे.
८. छाननीनंतर वैध नामनिर्देशन पत्रे प्रसिद्धी करणे.
९. नामनिर्देशन पत्र माघारी.
१०. माघारीनंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणे आणि निवडणूकीसाठी चिन्ह वाटप करणे.
११. उमेदवारांकडुन निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांची नियुक्ती.
१२. मतदान घेणे.
१३. मतपत्रिकांची मोजणी करणे.
१४. मतदान निकाल जाहीर करणे.
१५. निवडून आलेल्या उमेदवारांची अधिसुचना जारी करणे.
१६. संस्थेतील निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये पदाधिकारी निवडणूक घेणे.

**डिजिटल मतदार याद्या संबंधी माहिती आणि किमान आवश्यक तांत्रिक पूर्तता निकष —**

१) नामिकाकृत सेवापुरवठादार (empanelled service providers for digital voters list preparation) यांच्याकडून कोणत्याही सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्या यांची तात्पुरती व अंतिम मतदार यादी 'महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४' चे नियम क्र. ७ व १० अनुसार विहित करण्यात आलेल्या नमूना क्र. ई-३ मध्ये आडनांव-नांव-वडीलांचे/पतीचे नांव (वर्णक्रमानुसार), कोणतेही असल्यास व पत्ता या प्रमाणे तयार करणे आवश्यक आहे.

२) तात्पुरती व अंतिम मतदार यादी साठी आवश्यक असलेला सर्व तपशील सेवापुरवठादारांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रामुख्याने सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्या यांचे सचिव / व्यवस्थापक / मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे.

३) कोणत्याही सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्या यांच्या संदर्भातील उपरोक्त याद्या मराठीमध्ये Excel मध्ये Unicode Devnagri DOVTSurekhMR Font Size 12 उपयोजित करून तयार करणे आवश्यक आहे.

४) तात्पुरती व अंतिम मतदार यादी तयार करणे आणि अपलोड करणे या संदर्भातील सर्व तपशीलाची सुरक्षितता सर्वोच्च असून संपूर्ण याद्यांचे मालकी-हक्क प्राधान्याने संबंधित संस्था आणि या कार्यालयाकडे राहतील. याबाबत स्पष्ट उल्लेख असलेल्या वैधानिक तरतूदींचा समावेश यासंबंधीच्या करारनाम्यात करण्यात येईल.

५) कोणत्याही प्रकारच्या गोपनीयतेचा अथवा स्वामित्वहक्कासंबंधित करारातील अटी-शर्तींचा भंग निष्काळजीपणाने अथवा जाणूनबुजून केला असल्याचे सिद्ध झाल्यास त्याबाबत दोषी सेवापुरवठादारांना कायमचे black-list करण्यात येऊन दंडात्मक शिक्षेस सामोरे जावे लागेल याची नोंद घेण्यात यावी.

६) अर्जदारांनी प्राधिकरणाकडे या कार्यालयाने विहित केलेल्या नमून्यामध्ये अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज करणेबाबत महत्वाची सूचना (१) तांत्रिक लिफाफा व दरपत्रक लिफाफा स्वतंत्रपणे सीलबंद करावेत. (२) सदर दोनही लिफाफे एका लिफाफ्यामध्ये सिलबंद करून त्यावर प्राधिकरणाचा पत्ता आणि 'सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे यासाठी देकार आणि दरपत्रक सादर करणेबाबत' असा मजकूर स्पष्टपणे नमूद करण्यात यावा.

७) दरपत्रके सादर करावयाचे मुदतीनंतर प्राप्त झालेले लगेच दि. ०१-०२-२०२४ रोजी दु. १२.०० वा. सदरहू प्रस्तावातील तांत्रिक लिफाफे सर्व-प्रथम उघडण्यात येतील व त्यांची छाननी करण्यात येईल. तांत्रिक माहित्यांच्या छाननीमध्ये पात्र ठरणाऱ्या सेवापुरवठादारांचेच दरपत्रक लिफाफे पुढे उघडण्यात येतील.

८) पुरेशा संख्येने दरपत्रके प्राप्त न झाल्यास अथवा अन्य कोणत्याही बाबीमुळे कोणतेही कारण न देता सदर खरेदी प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाचे राहतील.

९) Jurisdiction — पुणे म. न. पा. क्षेत्र, पुणे असे राहील.

**सचिव**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१**

## अर्जाचा नमूना

**महत्वाची सूचना** (१) तांत्रिक लिफाफा व दरपत्रक लिफाफा स्वतंत्रपणे सीलबंद करावेत. (२) सदर दोनही लिफाफे एका लिफाफ्यामध्ये सिलबंद करून त्यावर प्राधिकरणाचा पत्ता आणि 'सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे यासाठी देकार आणि दरपत्रक सादर करणेबाबत' असा मजकूर स्पष्टपणे नमूद करण्यात यावा.

(अर्जदार सेवापुरवठादाराच्या लेटरहेडवर)

**(अ) तांत्रिक लिफाफा**

दिनांक ----------------

प्रति

**मा. सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१**

**विषय** – सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे यासाठी देकार आणि दरपत्रक सादर करणेबाबत.

**संदर्भ** – वरील विषयाबाबत सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांची क्र. --------- दि. ----- ची जाहिरात.

महोदय,

आम्ही ----------------------------, पत्ता --------------- विषयांकित कामासाठी खालीलप्रमाणे अर्जदार संस्थेची माहिती सादर करीत आहोत. सदर माहिती बिनचूक आणि खरी असून कोणत्याही प्रकारे त्यामध्ये त्रुटी आढळून आल्यास आमचा अर्ज कोणतेही कारण न देता नाकारला जाण्यास पात्र ठरेल याबाबत आम्हास जाणीव करून देण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | अर्जदार संस्थेचे नांव व रजिस्टर्ड पत्ता | |
| २ | अर्जदार संस्थेचे संपर्क व्यक्ती व संपर्क क्र. | |
| ३ | अर्जदार संस्थेचे नोंदणी तपशील व दिनांक | |
| ४ | अर्जदार संस्थेचा डिजिटल मतदार यादी तयार करण्याच्या कामाचा अनुभव<br>१. संस्था संख्या --- व त्यांची सरासरी मतदार संख्या ---<br>२. कामकाजाचा एकूण अनुभव --- वर्षे | |
| ५ | अर्जदार संस्थेकडील कायमस्वरूपी नेमलेले तांत्रिक मनुष्यबळ – एकूण ---- संख्या व त्याची खालील विगतवारी<br>१. पदनाम ---- संख्या ---<br>२. पदनाम ---- संख्या ---<br>३. पदनाम ---- संख्या --- | |

| अ. क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| ६ | अर्जदार संस्थेची मागील ३ वर्षांची उलाढाल<br>सन २०२०-२१ – रु. लाख ------ (ITR, GST प्रमाणपत्र जोडावेत)<br>सन २०२१-२२ – रु. लाख ------ (ITR, GST प्रमाणपत्र जोडावेत)<br>सन २०२२-२३ – रु. लाख ------ (ITR, GST प्रमाणपत्र जोडावेत) | |

सोबत जोडण्यात येत आहे – (१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र, (२) मागील ३ वर्षांचे ITR, GST प्रमाणपत्र.

स्थळ - -----------

अर्जदाराचे नांव, स्वाक्षरी,

दिनांक व संस्थेचा शिक्का

**महत्वाची सूचना** (१) तांत्रिक लिफाफा व दरपत्रक लिफाफा स्वतंत्रपणे सीलबंद करावेत. (२) सदर दोनही लिफाफे एका लिफाफ्यामध्ये सिलबंद करून त्यावर प्राधिकरणाचा पत्ता आणि 'सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे यासाठी देकार आणि दरपत्रक सादर करणेबाबत' असा मजकूर स्पष्टपणे नमूद करण्यात यावा.

(अर्जदार सेवापुरवठादाराच्या लेटरहेडवर)

**(ब) दरपत्रक लिफाफा**

प्रति

**मा. सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१**

**विषय** – सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे यासाठी देकार आणि दरपत्रक सादर करणेबाबत.
**संदर्भ** – वरील विषयाबाबत सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांची क्र. --------- दि. ----- ची जाहिरात.

महोदय,

आम्ही ----------------------------, पत्ता --------------- विषयांकित कामासाठी खालीलप्रमाणे अर्जदार संस्थेचे दर सादर करीत आहोत.

| अ. क्र. | स्लॅब | दर (कोटेशन) रुपये |
|---|---|---|
| १ | मतदार संख्या १०० पेक्षा कमी साठी दर | |
| २ | मतदार संख्या १०० ते १९९ साठी दर | |
| ३ | मतदार संख्या २०० ते २९९ साठी दर | |
| ४ | मतदार संख्या ३०० ते ४९९ साठी दर | |
| ५ | मतदार संख्या ५०० ते ९९९ साठी दर | |
| ६ | मतदार संख्या १००० ते ९९९९ मधील वाढीव प्रत्येक १०० मतदार संख्येसाठी दर | |
| ७ | मतदार संख्या १०००० ते ४९९९९ मधील वाढीव प्रत्येक १०० मतदार संख्येसाठी दर | |
| ८ | मतदार संख्या ५०००० व त्यावरील कोणत्याही संख्येकरितां वाढीव प्रत्येक १०० मतदार संख्येसाठी दर | |

स्थळ - -----------

अर्जदाराची स्वाक्षरी व दिनांक